Exh. 17

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायधीश वरिष्ठ स्तर सावनेर यांचे न्यायालय**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक १२९/२०२५;** पेशी ता: ३-०२-२०२६

ज्ञानेश्वर देवरावजी बोनसुले

विरुद्ध

नितीन यादवराव आवारी व इतर एक

Order
Plff. to say

Digitally signed by SANJEEV AKARAM SARDAR

CJSD Saoner.
03-02-2026

**<u>दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील ऑर्डर ७ रूल ११ नुसार वादी यांचा दावा फेटाळण्यासाठी प्रतिवादी क्रमांक १ यांचा अर्ज</u>**

प्रतिवादी क्रमांक १ सविनय निवेदन करत कि :

१) वादी अर्जदार यांनी घोषणा आणि मनाई हुकुमाकरिता सदरचा दावा दाखल केल्याचे दिसून येते. वादी यांच्या दाव्याचे अवलोकन केले असता वादी यांनी सहमामलतदार तथा नायब तहसीलदार कळमेश्वर यांनी रा. मा क्रमांक ०१/एम.सी.ए.-५/२०२५-२६ मौजा कोहळी तह. कळमेश्वर या प्रकरणात दिनांक २१-११-२०२५ पारित केलेल्या आदेशाचे विरुद्ध सदरचा दावा प्रकरण दाखल केल्याचे दिसून येते.

C.J.S.D. SAONER दिवाणी न्यायालय क.स्त., सावनेर

२) वादी यांच्या दाव्याचे आणि वादअर्जातील परिच्छेद क्रमांक १ ते ९ मधील नमूद मजकुराचे अवलोकन केले असता तसेच वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्रमांक १ यांनी त्यांच्या मालकी कब्जातील शेत सर्व्हे क्रमांक २९९ आणि ३०० मध्ये जाण्यायेण्याच्या पुर्वापारच्या वहिवाटीच्या रस्त्यावर वादी यांनी अडथळा केल्यामुळे प्रतिवादी क्रमांक १ यांनी तहसीलदार तथा मामलतदार कळमेश्वर यांच्या न्यायालयात वादी यांच्या विरुद्ध मामलतदार अधिनियम कलम ५ अंतर्गत दावाअर्ज करून प्रकरण दाखल केले होते आणि

तहसीलदार तथा मामलतदार कळमेश्वर यांनी त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रमांक म. स./प्रस्तु.-१/ताश. कळमेश्वर/ कावि-१४०८/२०२५ दिनांक ११-०८-२०२४ अन्वये नायब तहसीलदार कळमेश्वर (राजस्व मंडळ, मोहपा) यांना सदर प्रकरणात मामलतदार अधिनियमनुसार पुढील कारवाई करण्याकरिता सहमामलतदार म्हणून प्रतिवादी क्रमांक २ यांना प्राधिकृत करून त्यांचेकडे पुढील कारवाई करण्याकरिता प्रकरण पाठविण्यात आले आणि मामलतदार अधिनियमनुसार प्रकरण पंजीबद्द करून प्रकरणात पुढील कारवाई करण्यात आली.

३) वादी यांच्या स्वतःच्या कथनानुसार प्रतिवादी क्रमांक ३ यांनी वादी अर्जदार आणि प्रतिवादी क्रमांक १ यांना नोटीस काढून वादअर्जावर लेखीजवाब सुनावणीची संधी देऊन, मोकाचौकशीची नोटीस काढून संबधित तलाठी यांच्याकडून मौकाचौकशी करून व त्यानंतर मौकाचौकशीपंचानाम्यावर दोन्ही पक्षाचे यांचे लेखी म्हणणे पटलावर घेऊन आणि साक्षपुरावा घेऊन आव्हानित आदेश दिनांक २१-११-२०२५ पारित केल्याचे नमूद केले आहे. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्रमांक २ सहमामलतदार यांनी मामलतदार अधिनियम कलम २१ पोटकलम (२) अन्वये बेकायदेशीर मनाई हुकुमाचा आदेश काढल्याचे नमूद केले आहे आणि मा दिवाणी न्यायालयासमोर सहमामलतदार यांनी मामलतदार अधिनियम १९०६ अंतर्गत दिनांक २१-११-२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशाला वादी यांनी सदर दाव्याद्वारे आव्हान दिल्याचे दिसून येते. या अनुषंगाने प्रतिवादी क्रमांक १ सविनय नमूद करतात कि प्रतिवादी क्रमांक २ सहमामालातदार यांनी पारित केलेला आव्हानित आदेश मामलतदार अधिनियमातील तरतुदीनुसार असून दोन्ही पक्षांना सुनावणीची पुरेशी संधी देऊन आणि नैसर्गिक न्याय तत्वाचेपालन करून आणि मौकाचौकशी करून आणि दोन्ही पक्षांनी सादर केलेल्या साक्षपुराव्याचा विचार करून त्यांना मामलतदार अधिनियमातील असलेल्या अधिकाराचा वापर करून पारित केलेला आहे आणि त्यामुळे तो योग्य, उचित आणि कायदेशीर आहे.



C.J.S.D. SAO

४)    प्रकरणाच्या गुणवत्तेवर योग्य वेळी सविस्तर भाष्य करण्याचा अधिकार कायम ठेऊन प्रतिवादी सविनय नमूद करतात कि मा दिवाणी न्यायालयाला सदर दावा दाखल करून घेण्याचा आणि चालविण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी सविनय नमूद करतात कि वादी यांच्या स्वत:च्या कथनानुसार आव्हानित आदेश सहमामलतदार यांनी मामलतदार अधिनियम १९०६ अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारानुसार आणि मामलतदार अधिनियम १९०६ कलम ५ मधील तरतुदीनुसार त्यांना असलेलेल्या कायदेशीर अधिकारानुसार पारित केला आहे. सदर मामलतदार अधिनियम १९०६ नुसार मामलतदार तसेच सहममलतदार यांचे न्यायालय हे दिवाणी न्यायालयाप्रमाणे न्यायालय असून त्यांना मामलतदार अधिनियम १९०६ कलम ५ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार शेतीच्या वहिवाटीच्या रस्त्यासंबधी आणि रस्त्याला निर्माण केलेला अडथळा दूर करण्यासंबधी दावा दाखल करून, योग्य ते आदेश पारित करण्याचे आणि त्यासंबधी कारवाई करण्याचे आणि उचित मनाई आदेश पारित करण्याचे न्यायिक अधिकार आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे मामालतदार तसेच सहमामालतदार यांचे न्यायालय हे दिवाणी न्यायालयाप्रमाणे न्यायालय असून त्यांच्याकडे दिवाणी प्रक्रिया सहिता प्रमाणे मामलतदार अधिनियम १९०६ कलम ७ नुसार दावा सत्यापित करून आणि त्यात दाव्याचे कारण नमूद करून विहीर मुदतीत दावा दाखल करावा लागतो. त्यामुळे त्यात केलेले प्रकरण हे दावाप्रकरण असून मामलतदार अधिनियम १९०६ नुसार मामलातदार तसेच सहमामालतदार यांचे न्यायालय हे दिवाणी न्यायालयाप्रमाणे न्यायालय असून त्यांनी पारित केलेला आव्हानित आदेश हा न्यायिक आदेश आहे. तसेच सदरचे मा दिवाणी न्यायालय हे मामलतदार अधिनियमातील तरतुदीनुसार पारित केलेल्या आदेशाविरुद्ध अपिलेट न्यायालय नाही त्यामुळे मा न्यायालय हे दाव्यातील आव्हानित आदेशाविरुद्ध अपिलेट म्हणून बसून दावा दाखल करून त्यावर न्यायनिर्णय करणे कायद्याला आणि कायद्यातील तरतुदीला धरून नाही. मा न्यायालयाच्या न्यायिक अधिकार क्षेत्रात सदरची बाब येत नाही.

५) प्रतिवादी सविनय नमूद करतात कि वादीअर्जदार यांनी सहमामालतदार यांनी दिनांक २१-११-२०२५ रोजी पारित केलेल्या आव्हानित आदेशास मामलतदार अधिनियमातील तरतुदीनुसार पुनरीक्षण अर्जाद्वारे संबधित सक्षम अधिकारी यांचेकडे आव्हान दिलेले नाही त्यामुळे सदरचा आदेश वादी यांच्यावर बंधनकारक असून वादी यांना सदरचा दिवाणी दावा दाखल करून सहमामालतदार यांनी दिनांक २१-११-२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशास आव्हान देता येनार नाही. तसेच त्यामुळे मा न्यायालयाला सदर आदेशाविरुद्ध दावा दाखल करून घेण्याचा आणि तो चालविण्याचा कोणताही न्यायिक अधिकार नसून वादी यांनी दाखल केलेला दावा मा न्यायालयाच्या न्यायिकअधिकारक्षेत्रात येत नाही.

६) प्रतिवादी क्रमांक १ सविनय नमूद करतात कि या पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मामलतदार अधिनियम १९०६ नुसार मामलतदार तसेच सहमामलतदार यांचे न्यायालय हे दिवाणी न्यायालयाप्रमाणे न्यायालय असून सहमामालतदार यांनी दिनांक २१-११-२०२५ रोजी पारित केलेला आदेश हा न्यायिक आदेश आहे. वादी यांच्या स्वतःच्या कथनानुसार सहमामालतदार यांच्या कडील दावा प्रकरणात वादी तसेच प्रतिवादी स्वतः पक्षकार होते आणि सदर प्रकरणात दोन्ही पक्षांना सुनावणीची पुरेशी संधी देऊन आणि नैसर्गिक न्याय तत्वाचेपालन करून आणि मौकाचौकशी करून आणि दोन्ही पक्षांनी सादर केलेल्या साक्षपुराव्याचा विचार करून त्यांना मामलतदार अधिनियमातील असलेल्या अधिकाराचा वापर करून पारित केलेला आहे. त्यामुळे सहमामालतदार यांनी काढलेले निष्कर्ष हे वादी यांना बंधनकारक आहे. तसेच प्रतिवादी क्रमांक २ सहमामलतदार यांनी पारित केलेला आव्हानित आदेश मामलतदार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना असलेल्या न्यायिक अधिकारानुसार पारित केलेला असल्यामुळे आणि या प्रकरणात आधीच सक्षम न्यायालयात न्यायनिर्णय झाला असल्याने दिवाणी प्रक्रिया सहित कलम ११ मधील तरतुदीनुसार आणि रेसज्युडीकेटा च्या न्यायिक तत्वानुसारसुद्धा मा

दिवाणी न्यायालयाला सदरचा दिवाणी दावा दाखल करून घेन्यास आणि तो चालविण्यास प्रतिबंध घातला आहे. त्यामुळे मा दिवाणी न्यायालयासमोर सदर दिवाणी दावा चालू शकत नाही. मा दिवानी न्यायालयाला सदर आदेशाविरुद्ध दावा दाखल करून घेण्याचा आणि तो चालविण्याचा कोणताही न्यायिक अधिकार नसून वादी यांनी दाखल केलेला दावा मा न्यायालयाच्या न्यायिकअधिकारक्षेत्रात येत नाही. त्यामुळे तो फेटाळण्यात यावा.

७) प्रतिवादी सविनय नमूद करतात कि वादी यांनी म न्यायालयासमोर दाखल केलेल्या दाव्यात सहमामलातदार यांना प्रतिवादी क्रमांक २ म्हणून प्रतिपक्ष म्हणून सामील केले आहे. परंतु मामलतदार अधिनियम १९०६ मधील कलम २६ च्या तरतुदीनुसार त्यांच्या विरुद्ध दावा दाखल करण्यास तसेच त्यांनी पारित केलेल्या आदेशाविरुद्ध अथवा त्यांनी केलेल्या कारवाई विरुद्ध दावा दाखल करण्यास प्रतिबंध घातला आहे. त्यामुळे मामलतदार अधिनियम १९०६ मधील कलम २६ च्या तरतुदीनुसारसुद्धा वादी यांनी दाखल केलेला सदरचा दावा कायद्यानुसार सुसंगत आणि योग्य नसून बेकायदेशीर आहे. मा दिवाणी न्यायालयाला सदरचा दिवाणी दावा दाखल करून घेण्यास आणि तो चालविण्यास प्रतिबंध घातला आहे. त्यामुळे मा दिवाणी न्यायालयासमोर वादी यांनी दाखल केलेला दिवाणी दावा चालू शकत नाही. मा दिवानी न्यायालयाला सदर आदेशाविरुद्ध दावा दाखल करून घेण्याचा आणि तो चालविण्याचा कोणताही न्यायिक अधिकार नसून वादी यांनी दाखल केलेला दावा मा न्यायालयाच्या न्यायिकअधिकारक्षेत्रात येत नाही. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता मधील ऑर्डर 7 रूल 11 (d) मधील तरतुदीनुसार सदरचा दावा प्रतिबंधित असल्याने मा दिवाणी न्यायालयासमोर वादी यांनी दाखल केलेला दिवाणी दावा चालू शकत नाही त्यामुळे वादी यांचा दावाअर्ज फेटाळण्यात यावा.

प्रार्थना : (१) मा न्यायालयास सविनय प्रार्थना करण्यात येते कि वर नमूद बाबी आणि परिस्थितीचा विचार करता वादी यांनी मा न्यायालयासमोर दाखल केलेला दिवाणी दावा फेटाळण्यात यावा.

(२) मा न्यायालयास योग्य वाटेल ते न्यायोचीत आदेश वादी यांच्याविरुद्‌ध पारित करावे.

सावनेर

दिनांक: ०३-०१-२०२६

प्र. क्र. १ तर्फे अधिवक्ता प्रतिवादी क्रमांक १

**प्रतीज्ञालेख**

मी नितीन यादवराव आवारी वय: ३८ वर्ष धंदा : शेती रा. सेलू तह. कळमेश्वर, जि. नागपूर प्रतीज्ञेवर कथन करतो कि त्यांच्या परिच्छेद क्र. १ ते ७ मधील कथन केलेला मजकूर हा माझे सांगणे प्रमाणे तसेच मला मिळालेल्या कायदेशीर सल्ल्याप्रमाणे लिहिलेला असून त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. करिता आज दिनांक ०३-०२-२०२६ रोजी सदर अर्ज वाचून समजून त्यावर मी सही केली आहे करिता सावनेर येथे न्यायालयात येऊन समक्ष सत्यापित करीत आहे.

प्रतीज्ञार्थी

मी प्रतीज्ञार्थीस ओळखतो

विनोद के. कौटकर अधिवक्ता

(9)

Solemnly affirmed before me
on this 03 day of 02 /2026
namely by Shri.Smt. Nitin Yadaorao Awari
R/O Kalmeshwar, Dist. Nagpur age 38 yrs.
is personally identified before me
by Advocate V.K. Kautkar
signature is herewith appended

03/02/2026

Asstt. Superintendent
Civil Judge (Sr.Dn), Saoner
7829 9651 1713

C.J.S.D. SAONER